# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाचे मुखपत्र)

Registered PRGI NO - MAHMAR | 2015 | 63869

वर्ष–१३ * जुलै २०२६ * अंक – १३ * पृष्ठ संख्या – १८


## सहकार सप्ताह

सहकार से समृद्धि के 5 स्वर्णिम वर्ष



युवा बहुउद्देशीय संस्थेच्या प्रवर्तकांनी केंद्रीय सहकार राज्यमंत्र्यांची भेट घेऊन माहिती दिली. त्यावेळी उपस्थित महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, संचालक श्री. संभाजी धुंडरे– दि. ८ जून २०२६




सहकार सप्ताह उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर डावीकडून श्री. सुनील जोशी (पर्यावरण अभ्यासक), उपाध्यक्ष श्री. सुभाष कर्णिक, सचिव मनीषा कोष्टी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक श्री. विद्याधर अनास्कर, सहकार आयुक्त श्री. दिपक तावरे, माजी सनदी अधिकारी श्री. हरनामसिंग, महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, डॉ. शमसुद्दीन तांबोळी अध्यक्ष मुस्लिम सत्यशोधक समिती. – दि. ४ जुलै २०२६.

सहकार से समृद्धि के 5 स्वर्णिम वर्ष



मानसी विश्वासनगर सोसायटी, नऱ्हे येथील उपस्थित सभासद व महासंघाचे संचालक दि. ४ जून २०२६.



मानसी विश्वासनगर सोसायटी नऱ्हे येथे सोसायटी व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित महासंघाचे ज्येष्ठ संचालक श्री. सुभाष ढवळे, श्री. अनिल असगेकर, श्री. विलास थोरात, श्री. शिवाजी उराडे, तसेच संस्थेचे पदाधिकारी व सदस्य. दि. ४ जून २०२६



नाशिक फाटा मेट्रो स्टेशन येथील गेरा एम्पोरियम बी आणि सी प्रिमायसेस सह. संस्थेत एक दिवसीय प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रशिक्षक महासंघाच्या सचिव मनीषा कोष्टी, संचालक ॲड. मृद्गंधा जोशी, गेरा एम्पोरियमचे अध्यक्ष श्री. अभिजीत कुलकर्णी व डॉ. महेंद्र सेठीया, सहभागी प्रशिक्षणार्थी- दि. १४ जून २०२६




महासंघाचे संचालक श्री. अव्हेलिनो नरोना यांनी त्यांच्या गोवा भेटीत श्री. आशितोष आपटे गोव्याचे को-ऑपरेटिव्ह रजिस्ट्रार यांची भेट घेऊन राष्ट्रीय सहकार धोरण यावर चर्चा केली. दि. ८ जून २०२६.

# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाचे मुखपत्र)

संपादक : **सुहास पटवर्धन,** अध्यक्ष

पत्ता : ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेससमोर, पुणे - ४११०३०.

संपादन सहाय्य : **संचालक मंडळ**

**दूरभाष** : **०२०-२४४५४०१०**

**ई-मेल** : **punefed@gmail.com**

**वेबसाईट** : **www.punefed.com**

**यूट्यूब चॅनल** : **Pune District Housing Federation**

**इन्स्टाग्राम** : **instagram.com / maharashtrahousingfederation**



© : 'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित यांचे स्वाधीन



प्रकाशक : **श्री. सुहास केशव पटवर्धन**

मुद्रक : **श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस,** ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. भ्रमणध्वनी : ९८९००७३९४७


## अनुक्रमणिका


| क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे | ४ |
| २. | संपादकीय | ५ |
| ३. | सहकार सप्ताह कार्यक्रम | ६ |
| ४. | Committee Handover Check List in CHS | ७ |
| ५. | राजकारणविरहित सहकार अपेक्षित | १० |
| ६. | महासंघाचे सभासदत्व | ११ |
| ७. | महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम २०२६चे संक्षिप्त विश्लेषण | १३ |
| ८. | नियमित पान | १६ |



'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित यांचे मालकीचे असून त्यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक श्री. सुहास केशव पटवर्धन यांनी श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस, ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. येथे छापून ३१३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक - **सुहास केशव पटवर्धन,** मुद्रण स्थान : **श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस - ९८९००७३९४७**


**कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.**

**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्म्स, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस् पावती पुस्तके, व्हाऊचर्स यांची योग्य दरात विक्री महासंघाच्या मुख्य कार्यालयातून सकाळी १०.३० ते सायं. ५.३० या वेळेत करण्यात येते.**

१) भाडेकरू सहभागीदारी संस्था पोटनियम– (फ्लॅट टाईप) इंग्रजी व मराठी
२) संस्था नोंदणी फॉर्मस् संच
३) पोटनियम दुरुस्ती फॉर्मस् संच
४) सभासद फॉर्म (इंग्रजी व मराठी)
५) सहसभासद फॉर्म
६) ट्रान्सफर फॉर्म संच
७) फॉर्म 'ओ' (लेखापरीक्षण दुरुस्ती)
८) फॉर्म 'ओ' पुरवणी
९) नॉमिनेशन फॉर्म (इंग्रजी व मराठी)
१०) रोजकीर्द
११) सभासद रजिस्टर नमुना 'आय'
१२) J रजिस्टर
१३) शेअर रजिस्टर
१४) प्रोसिडिंग बुक
१५) पावती पुस्तके
१६) व्हाऊचर पुस्तके
१७) व्यवस्थापन मार्गदर्शिका
१८) वसुली पुस्तिका
१९) निवडणूक पुस्तक
२०) नॉमिनेशन रजिस्टर
२१) मॉर्गेज रजिस्टर

## महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे

- १. **स्कुलशॉपी –** दुकान क्र. ९, कॉर्पोरेशन बिल्डिंग, चैतन्य हॉस्पिटलसमोर, चापेकर चौक, चिंचवड, पुणे – ४११०३३. भ्रमणभाष : ९३२६०५४९०६
- २. **श्री स्टेशनर्स –** रेव्हेन्यू कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे भ्रमणभाष : ९२७३५०५६०४
- ३. **निशा कन्सल्टन्सी –** कृतिका अपार्टमेंट, ग्रीन फुड रेस्टॉरंट जवळ, कोथरुड, पुणे ४११०३८. भ्रमणभाष : ९८५०८८८९७९
- ४. **सोसायटी प्लस –** बाजीराव रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे–४११०३०. भ्रमणभाष : ९३७००८८९९५
- ५. **प्राईड साईन –** वडगाव धायरी, पुणे – ४११०४१. भ्रमणभाष : ९११२१९१६११
- ६. **सुकन्या निरगुडे –** एच–४२, एकता सोसायटी, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे – ४११०३८. (शाखा : सासवड, कोडीत) भ्रमणभाष : ९१५६४१४१९१
- ७. **मे. एस. जे. खामकर ॲण्ड असोसिएटस् –** मुंढवा घोरपडी रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, मुंढवा, पुणे – ४११०३६. भ्रमणभाष : ९६२५३४३४३४
- ८. **स्वाती पवार – समर्थ सर्व्हिसेस –** स.नं. ४३/२, शिवांजली लेन नं. ३, दत्तनगर, आंबेगाव, पुणे – ४११०४६. भ्रमणभाष : ९४०३९७८९४३.
- ९. **पी.एल. इंदोरे ॲण्ड असोसिएटस् –** कमलराज दत्तविहार सोसायटी, मोशी, चिखली रोड, मोशी, पुणे – ४१२१०५. भ्रमणभाष : ९७३०७६७५७९
- १०. **द स्टेशनरी आयकॉन –** शॉप नं. ६, तुषार कॉम्प्लेक्स, पेट्रोलपंप समोर, पौड रोड, भुगाव, पुणे – ४१२११५.
- ११. **कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, कोंढवा पोलिस स्टेशनमागे, पुणे – ४११०४८. दूरभाष : ०२०–४८६०७७१७
- १२. **सोसायटी स्मार्ट –** इस्टर्न विंग, जय गणेश विश्व, विश्रांतवाडी चौक, पुणे – ४११०१५. भ्रमणभाष : ९९६०८२९९९८
- १३. **शितल जाधव –** हिंजवडी पुणे को. ऑप. हाऊसिंग अलायन्स भ्रमणभाष : ८४८२८७३४४५
- १४. **चैतन्य पुरंदरे –** विश्वगंगा कॉम्प्लेक्स, संतोष हॉलजवळ, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे – ४११०५१. भ्रमणभाष : ९८६०८२०३९०

## पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित

punefed@gmail.com

♦ *संचालक मंडळ* ♦

| | |
|---|---|
| मा. सुहास पटवर्धन, अध्यक्ष | ९४२२००४७०१ |
| मा. सुभाष कर्णिक, उपाध्यक्ष | ९७६६६०६१४६ |
| सौ. मनीषा कोष्टी, सचिव | ९९२२४१९२१६ |
| मा. चारूहास कुलकर्णी, कोषाध्यक्ष | ९५५२५४६६०७ |
| मा. अनिल असगेकर | ९९६०६०८०७३ |
| मा. सुभाष ढवळे | ९४२१०५८२५५ |
| ॲड. मृद्गंधा जोशी | ८७६६४३२७६९ |
| मा. जुजर हैदरी | ९३७१०१७४४० |
| मा. शिवाजी उराडे | ९४२३०१५९९६ |
| मा. अजित चौगुले | ७७५७०२१९५३ |
| मा. विलास थोरात | ९८९००५४३५१ |
| ॲड. प्रकाश तोंडारे | ९७६३६०३३८४ |
| मा. समीर रुपदे | ९८५०५६७४७५ |
| मा. मनोहर देशपांडे | ९३७१०७३७२७ |
| मा. राजन प्रसादे | ९६०४२१२४३० |
| मा. संभाजी घुंडरे | ९८८१०७७२९६ |
| मा. संजय सूर्यवंशी | ९६२३९२९८८९ |
| मा. अव्हेलिनो नरोना | ९९७०४७३१८९ |

♦ *तज्ञ संचालक* ♦

ॲड. वसंतराव कर्जतकर

आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी

♦ *कार्यकारी संचालक* ♦

| | |
|---|---|
| कर्नल प्रमोद दहीतुले | ९९९९५३७४३२ |


## संपादकीय

**स**हकारातून समृद्धी हे ब्रीदवाक्य घेऊन सप्ताह सुरू झाला. सहकार सप्ताह साजरा करणं म्हणजे सहकाराला बळकटी देणे. विविध क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करून सभासदांनी एकत्र येऊन काम करणं. त्याच दृष्टीने महाराष्ट्र राज्य सह. गृह संस्था आणि अपार्टमेंटच्या समन्वयाने महाराष्ट्रातील पहिली महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन होत आहे. जास्तीत जास्त युवांनी या संस्थेत सहभागी होऊन सहकारातून पुढे जावे.

याचबरोबर सहकाराचे उदाहरण म्हणजे आपली लोकशाही व्यवस्था. आपण लोकप्रतिनिधी निवडून देतो आणि ते शासनाचा कराभार सांभाळतात, पण त्यासाठी जबाबदार नागरीक म्हणून आपण सर्वांनी मतदान करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. सध्या सुरू असलेल्या SIR - Special Intensive Rivision म्हणजे मतदार याद्यांची सखोल फेरतपासणी यासाठी आपल्या जवळच्या मतदान केंद्रात जाऊन BLO कडून तसेच नगरसेवकांकडून किंवा स्थानिक पक्ष सदस्यांकडून माहिती घ्या आणि फॉर्म भरून आपले मतदार यादीतील नाव निश्चित करा. नव मतदारांनीही यात नाव नोंदणी करायची आहे. देशातील घडामोडींवर भाष्य करण्याचा अधिकार मतदान करणाऱ्या सुजाण नागरीकांनाच असतो. हे लक्षात घ्या आणि फॉर्म भरा.

देशाची लोकशाही बळकट करा.

**जय सहकार.**

**– मनीषा विजय कोष्टी**
**सचिव**

***


## वास्तुदर्शन मासिक जाहिरात दरपत्रक ✻ GST सह

| | ब्लॅक ॲण्ड व्हाईट | फोर कलर |
|---|---|---|
| १/३ पान | २,३६०/- | - |
| अर्धे पान | ३,५४०/- | - |
| पूर्ण पान | ४,७२०/- | १७,७००/- |
| पूर्ण दोन पाने | - | २३,६००/- |

✻ हे दर प्रत्येक महिन्यासाठी लागू राहतील.

✻ १२ महिन्यांसाठी जाहिरात दिल्यास वरील दरात एक महिन्याची सूट मिळेल.

सहकारातून समृद्धीकडे वसुधैव कुटुंबकम सहकारी संस्थांमधील सहकार्य

MSCBA MAFCOCS

सहकार से समृद्धि के 5 स्वर्णिम वर्ष

भारत सरकारच्या सहकार खात्यास ५ वर्षे पुर्ण झाल्याबद्दल

# सहकार सप्ताह

**सोमवार, दि. २९ जुन २०२६ ते सोमवार, ६ जुलै २०२६**

## सहकार सप्ताह कार्यक्रम

केंद्रीय सहकार मंत्रालयाला पाच वर्षे पूर्ण झाली. त्या पार्श्वभूमीवर २९ जून २०२६ ते ६ जुलै २०२६ या दरम्यान सहकार सप्ताह साजरा केला जात आहे. त्यातील एक कार्यक्रम स्कूल ऑफ लॉ, एमआयटी वर्ल्ड प्लेस युनिव्हर्सिटी, कोथरूड येथे ३० जून २०२६ ला चर्चासत्र आयोजित केले होते. सदर कार्यक्रमास कुलगुरु डॉ. रवी कुमार चिटनीस, लॉ कॉलेजचे डीन डॉक्टर संतोष आघाव, रामचरण स्कूल ऑफ लिडरशीपचे डॉ. सतीश सहा, लिगल जीनियसचे श्री. नितीन उदास आणि महासंघाचे संचालक ॲडव्होकेट प्रकाश तोंडारे यांनी मार्गदर्शन केले.

डॉक्टर चिटणीस यांनी महासंघातर्फे सहकार सप्ताह साजरा करून सहकारी संस्थांना मार्गदर्शन करण्याबाबत जो उपक्रम हाती घेतला आहे त्याबाबत आनंद व्यक्त केला.

त्यानंतर डॉ. सतीश सहा यांनी सहकारी संस्थांची उपयुक्तता विषद केली. डॉक्टर संतोष आघाव यांनीही सहकार चळवळीत सर्वांनी आणि विशेषतः युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. युवकांना एकत्र आणून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्याबाबत पुढाकार घेतल्याबाबत महासंघाचे अभिनंदन केले.

श्री. नितीन उदास यांनी कृत्रिम बुद्धिमत्ताचा वापर करून सहकारी कायद्यांवर न्यायालयाने दिलेल्या निर्णयांचे संकलन करुन त्यांनी तयार केलेल्या ॲपचा उपयोग सहकारी संस्थांना कशाप्रकारे करता येईल याचे विस्तृत विवेचन केले.

ॲडव्होकेट प्रकाश तोंडारे यांनी सहकारी संस्थांना उपयुक्त अशा कायद्यातील तरतुदीचे सविस्तर विवेचन केले.

उपाध्यक्ष श्री. सुभाष कर्णिक, सचिव सौ. मनीषा कोष्टी, कोषाध्यक्ष श्री. चारुहास कुलकर्णी, संचालक श्री. राजन आणि श्री. थोरात कार्यक्रमाला उपस्थित होते. संचालक श्री. अव्हेलिनो नऱ्होना यांनी सूत्रसंचालन केले.

***

*With Best Compliments From*

**Structural Auditor**

**Indrakumar Jagtap**

B.E. (Civil), CHARTERED ENGINEER

**Mobile : 9822332510 * Email : indrakumar.jagtap@gmail.com**
**Web : www.structuralauditorpune.com**

**1, Vyankateshwara Society, Inside From Trimurti Hospital,**
**Sinhgad Road, Vadgaon Budruk, Pune 411041.**

# Committee Handover Check List in CHS

"Below are list of some important documents and certificates which most of the society should have and handover to new committee."

**Sr. No. Documents/Certificates.**

**Property/Building.**

1. Architect Certificate for area of each flat, common area and parking area (Original)
2. Completion Certificate (Original)
3 Occupancy Certificate (Original)
4. Approved RCC Plan with certificate (Original)
5. Clearance to operate Elevator (Original)
6. NOC from fire department (Original)
7. NOC from Electrical inspector (Original)
8. Approved CC building plan from Local Municipal Body
9. Approved OC building plan from Local Municipal Body
10. AMC Documents – Lifts, Transformers, Pumps, Generator and Gym equipment if any applicable (Original)
11. Undertaking or Promissory Note by Developer/ Builder that he will complete the Pending work within deadline. (take written Undertaking)
12. Drawings of water piping (Original)
13. STP drawing & certification by pollution control board (Original)
14. Drawing of electrical wiring including earthing point (Original)
15. All Legal Documents executed between the Builder & Landowner
16. Undertaking by the Builder regarding Indemnity & Limitation of Liabilities of the Society for all.
17. NA Order (Original)
18. Approved Construction Plan (Original)
19. Extract of 7/12 OR CTS and Mutation Entry No. [Original]
20. Land Agreement for Development Rights
21. City Survey Map / Tikka Sheets.

**Society**

1. Society Registration Certificate (Original)
2. Society Bye-law book (Original, Stamped)
3. Flats Buildup Area / Carpet area with owner Name (Member Register)
4. Share Certificates
5. Sale Deed copy / Index-2/Proof of Ownership of all Owners [Xerox]
6. Car Parking Allocation/Marking Record [original]
7. Contract / Work Orders with venders (original)
8. List of amenities in the apartment
9. Minutes Book of General Body (AGM/SGM)
10. Minutes Books of Managing Committee (MCM)
11. Share Register
12. Nomination Register
13. "I" Form Register
14. "J" Form Register
15. Nomination Form File
16. Membership Form File
17. Register of Transfer of Shares
18. Lift License, if applicable (original)
19. PAN Card
20. TAN Card
21. GST Certificate (If applicable)
22. Property Insurance Document, if any (Original)
23. Invoices and Warranties for all Assets – Pumps, Lift, Generator, Transformer, Pool Equipment's, Gym Equipment's [Original]
24. Detailes list of work pending till date & till what time you expect it to be Completed.
25. Asset Register
26. Members Loan Register / NOC Files
27. Bye laws of the Society approved by the Registrar
28. Structural Audit and Audit Registers
29. Associate Membership Register
30. Flat Transfer Register
31. Complaint from Members and correspondence thereof

32. Counterfoils of share certificates
33. Society Email ID / Password
34. Society Management Software rights & login details
35. All softcopy files & folder details
36. Application for Registering Society (A form)
37. Table giving information of society (B Form)

**Accounts**

1. District co-operative bank account passbook/ Statement (Share Capital)
2. Other Bank account Passbooks / Statements
3. Previous Year Audit Reports (Original)
4. Previous year books of account / General Ledgers
5. Petty Cash Register
6. FD Certificates
7. Payment Vouchers / Bill File
8. Counterfoils of cheques issued

***

## : महासंघाचे सहकार दरबार :

| अ.क्र. | सहकार दरबारचे नाव | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **धनकवडी –** रक्षालेखा सोसा., सर्व्हे क्र. ३०, विक्रमनगर, धनकवडी–४३. | पहिला रविवार<br>**श्री. शिवाजी उराडे** | (स. ११ ते १)<br>९४२३०१५९९६ |
| २. | **पिंपळे सौदागर –** गणेश रेसिडेन्सी, लोटस हॉस्पिटल जवळ, पिंपळे सौदागर, पुणे–२७. | पहिला रविवार<br>**श्री. चारुहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| ३. | **चिंचवड –** गोखले वृंदावन सोसा., चाफेकर चौक, चिंचवड, पुणे–३३. | दुसरा गुरुवार<br>**श्री. सुभाष कर्णिक** | (स. ११ ते १)<br>९७६६६०६१४६ |
| ४. | **मुख्य कार्यालय –** ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे–३०. | तिसरा शनिवार<br>**ॲड. प्रकाश तोंडारे** | (स. ११ ते १)<br>०२०–२४४५४०१० |
| ५. | **स्वप्नशिल्प –** स्वप्नशिल्प सोसा., वारजे क्षेत्रीय कार्यालयाजवळ, कोथरुड, पुणे–३८. | चौथा शनिवार<br>**श्री. सुभाष ढवळे** | (स. ११ ते १)<br>९४२१०५८२५५ |
| ६. | **तळेगाव दाभाडे –** समाज मंदिर (संस्था कार्यालय), समाज सेवक सह. गृह. संस्था म. (रेव्हेन्यू कॉलनी), चाकण रोड, फिश मार्केटच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे–४१०५०७. | चौथा रविवार<br>**ॲड. ज्योत्स्ना जोशी** | (स. ११ ते १)<br>९२६०२०१६५० |
| ७. | **सहकारनगर –** श्रीगजलक्ष्मी सह. गृह संस्था, सर्व्हे क्र. ८२/२अ, सहकारनगर–१, गांधी ट्रेनिंग कॉलेजसमोर, पुणे–०९. | दुसरा शनिवार<br>**श्री. श्रीराम कुंचुर** | (स. ११ ते १)<br>९४२२०१२१५६ |
| ८. | **औंध –** सुरोभी पार्क, ई–६०३, डीएसके आकाशगंगा शेजारी, नागरस रोड | दुसरा रविवार<br>**सौ. प्रीती शिरोडे** | (सायं. ४ ते ६)<br>९२८४५८८६३४ |
| ९. | **कोंढवा – कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८. | चौथा रविवार<br>**श्री. अव्हेलिनो नरोना** | (स. ११ ते १)<br>९९७०४७३१८९ |
| १०. | **सिंहगड रोड –** ट्युलिप सोसायटी, नवशा मारुती जवळ, पुणे – ४११०५१. | पहिला रविवार<br>**श्री. विलास थोरात** | (स. ११ ते १)<br>९८९००५४३५१ |
| ११. | **हिंजवडी –** यशवन सोसायटी, हिंजवडी,VJ एव्हेन्यू जवळ, माण रस्ता | पहिला शनिवार<br>**श्री. चारूहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| १२. | **गेरा एम्पोरियम गेटवे ए आणि सी कमर्शियल कॉम्प्लेक्स–** नाशिक फाटा, मेट्रो स्टेशन, कासारवाडी | चौथा शनिवार<br>**श्री. अभिजीत कुलकर्णी**<br>(सहकार मित्र) | (स. ११ ते १)<br>८८८८७२३४५ |

## ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे

**सरकारी नोकर किंवा लोकप्रतिनिधी यांनी लाचेची मागणी केल्यास संपर्क करा –**

**टोल फ्रि क्रमांक – 1064**

**दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802**
**(2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**
**Mobile App - www.acbmaharashtra.net**

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

**भ्रष्टाचारासंबंधी ऑनलाईन तक्रार येथे नोंदवा.**

**कोणत्याही शासकीय कार्यालयात लाचेची मागणी होत असल्यास संपर्क साधा**

**तर करा फक्त एक फोन 1064 किंवा 403781064**

**दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802 | (2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**


## पुणे मनपा सहाय्यक आयुक्त कार्यालय तपशील

पुणे मनपा कार्यक्षेत्रात सर्व क्षेत्रीय कार्यालयात **दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी ११ वाजता** नागरिकांच्या तक्रारीसंदर्भात **मोहल्ला कमिटी बैठक** असते. या बैठकीसाठी मनपाचे रस्ते, पाणी, आरोग्य, विद्युत, मलनिस्सारण विभागाचे अधिकारी उपस्थित असतात.

सहकारी गृह संस्थांचे सभासद/पदाधिकारी यांनी आपापल्या भागातील क्षेत्रीय कार्यालयातील बैठकीला उपस्थित राहून तक्रारी नोंदवाव्यात व पाठपुरावा करावा.

१) ढोले पाटील रोड – ०२० २५५९७३९४
२) येरवडा – कळस धानोरी – ०२० २५५०९१००
३) नगर रोड, वडगाव शेरी – ०२० २५५०९०००
४) शिवाजीनगर – घोले रोड – ०२० २५५०१५००
५) कोथरुड – बावधन – ०२० २५५०१६००
६) औंध – बाणेर – ०२० २५५०९७१०
७) धनकवडी – सहकारनगर – ०२० २५५०८९०४
८) वारजे कर्वेनगर – ०२० २५५५९७७०
९) सिंहगड रोड – ०२० २५५०८२००
१०) कोंढवा–येवलेवाडी – ०२० २५५०८८००
११) हडपसर – मुंढवा – ०२० २५५९७४००
१२) वानवडी – रामटेकडी – ०२० २५५९७४००
१३) कसबा – विश्रामबागवाडा – ०२० २५५९७६००
१४) भवानी पेठ – ०२० २५५०७२००
१५) बिबवेवाडी – ०२० २५५०८७००

***

सहकार से समृद्धि के 5 स्वर्णिम वर्ष

# राजकारणविरहित सहकार अपेक्षित

## विद्याधर अनास्कर यांचे मत, सहकार सप्ताहाचे पुण्यात उद्घाटन

''सहकार सप्ताहाच्या उद्घाटना निमित्त पंचवटी क्लब हाऊस पाषाण येथे सहकार ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सहकाराची शपथ घेऊन मा. खासदार वंदनाताई चव्हाण यांनी सर्व सह. गृह संस्थांच्या प्रतिनिधींना शुभेच्छा दिल्या.

या निमित्ताने पंचवटी पाषाण टेकडीच्या पायथ्याशी मान्यवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. त्यानंतर टाळ, मृदुंगाच्या गजरात सहकाराच्या जयजयकारात सहकार दिंडी PIC सभागृहापर्यंत काढण्यात आली. त्यामध्ये विविध संस्थांचे प्रतिनीधी तसेच महासंघाचे संचालक श्री. समीर रुपदे, श्री. संजय सूर्यवंशी, श्री. अव्हेलिनो नरोना, अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, सचिव मनीषा कोष्टी, कोषाध्यक्ष श्री. चारूहास कुलकर्णी, उपाध्यक्ष श्री. सुभाष कर्णिक, ज्येष्ठ संचालक श्री. सुभाष ढवळे व श्री. अनिल असगेकर, श्री. शिवाजी उराडे, श्री. अखिल चौगुले, श्री. विलास थोरात सहभागी झाले.

''सहकार आणि राजकारण यांचे नाते अतूट असले तरीही राजकारणविरहित सहकार अपेक्षित आहे. राजकीय नेतृत्वाने सहकाराभोवतीचे कुंपण या भमिकेतून काम करावे; परंतु कुंपणच शेत खाऊ लागले, तर काय करायचे हा प्रश्न उपस्थित होऊ नये म्हणून सहकार आणि राजकारण यामध्ये लक्ष्मण रेषा असणे आवश्यक आहे,'' असे मत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले.

केंद्रिय सहकार मंत्रालयाला यावर्षी पाच वर्ष पूर्ण होत असून, त्यानिमित्ताने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून आयोजित सहकार सप्ताहाच्या उद्घाटप्रसंगी २९ जून २०२६ ला PIC पंचवटी पाषाण येथे ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सनदी अधिकारी हरनामसिंग, सहकार आयुक्त दीपक तावरे, यशदाचे महासंचालक सुहास दिवसे, महाराष्ट्र हौसिंग सोसायटी ॲण्ड अपार्टमेंट फेडरेशनचे अध्यक्ष सुहास पटवर्धन आणि पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष कर्णिक, सचिव मनीषा कोष्टी आदि उपस्थित होते.

अनास्कर म्हणाले, ''सहकार म्हणजे लष्कराच्या भाकऱ्या थापणे हा दृष्टिकोन बदलून युवकांची क्रयशक्ती सहकार क्षेत्रात वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शालेय स्तरापासूनच सहकाराची बीजे रुजविणे अपेक्षित असताना शालेय अभ्यासक्रमातून सहकार नामशेष होत आहे, हे वास्तव खेदजनक आहे. पूर्वी शाळांमध्ये सहकार भांडार स्थापन करून त्याचे नियोजन विद्यार्थ्यांकडून केले जात होते.''

मा. तावरे साहेब म्हणाले, ''सहकार चळवळीला गती आणि नवीन दिशा प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने गेल्या पाच वर्षांत अनेक क्रांतिकारी निर्णय घेण्यात आले. सहकार विभागातील आमुलाग्र बदलामुळे या क्षेत्राची निकोप आणि सुदृढपणे वाढ होत आहे.'' प्रास्ताविक सुहास पटवर्धन यांनी, तर सूत्रसंचालन पर्यावरण अभ्यासू सुनील जोशी यांनी केले.

***

## जून २०२६ मध्ये एकूण २४ संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. महासंघ त्यांचे स्वागत करीत आहे.

१) **शिवांजली श्री सह. गृह. संस्था, मर्या.,** महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे ४११००६.

२) **आनंदघन सह. गृह. संस्था, मर्या.,** हिंगणे खु., पुणे ४११०५१.

३) **साईकृपा बी-२० सह. गृह. संस्था, मर्या.,** चिखली, प्राधिकरण, पुणे ४११०६२.

४) **साई वैकुंठ सह. गृह. संस्था, मर्या.,** चिखली, पुणे ४११०६२.

५) **कॅनरा बँक ऑफिसेस सह. गृह. संस्था, मर्या.,** प्रभात रोड, पुणे ४११००४.

६) **विश्रामबाग सह. गृह. संस्था, मर्या.,** सेनापती बापट रोड, पुणे ४११०१६.

७) **मानसी विश्वास नगर ए अँड बी विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** नऱ्हे, पुणे ४११०४१.

८) **डि एन अॅव्हीन्यु सह. गृह. संस्था, मर्या.,** पाषाण, पुणे ४११०२१.

९) **अंजोर सह. गृह. संस्था मर्या.,** बाणेर, पुणे ४११०४५.

१०) **अमर प्रक्रिती फेज-I सह. गृह. संस्था मर्या.,** गोऱ्हे बु., पुणे ४११०२५.

११) **नाऊ सेरेनो अे सह. गृह. संस्था, मर्या.,** बाणेर, पुणे ४११०४५.

१२) **रा कासा सह. गृह. संस्था, मर्या.,** बावधन खु., पुणे ४११०२१.

१३) **गुडविल स्क्रेअर प्रिमायसेस सह. गृह. संस्था, मर्या.,** धानोरी, पुणे ४११०१५.

१४) **प्रगती पार्क 'सी' विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

१५) **अगरवाल गार्डन सह. गृह. संस्था, मर्या.,** हडपसर, पुणे ४११०२८.

१६) **श्रावणी गार्डन सह. गृह. संस्था, मर्या.,** विमाननगर, पुणे ४११०१४.

१७) **मरुधर रेसिडेन्सी सह. गृह. संस्था, मर्या.,** कोंढवा बु., पुणे ४११०४८.

१८) **अॅड्रेस वन फेज १ आणि ३ सह. गृह. संस्था, मर्या.,** गहुंजे, ता. मावळ, पुणे ४१२१०१.

१९) **शिव अमृत सह. गृह. संस्था, मर्या.,** हिंगणे खु., पुणे ४११०५१.

२०) **वास्तुश्री डिओना सह. गृह. संस्था, मर्या.,** मुंढवा, पुणे ४११०३६.

२१) **ग्रीन हाईव्ह प्लस ए २ सह. गृह. संस्था, मर्या.,** फुरसुंगी, पुणे ४१२३०८.

२२) **स्थैर्य सह. गृह. संस्था, मर्या.,** कर्वेनगर, पुणे ४११०५२.

२३) **ट्रीनिटी आयकॉन सह. गृह. संस्था, मर्या.,** वाघोली, पुणे ४१२२०७.

२४) **वेस्टवुड इस्टेट्स फेज-२, विंग सी व डी सह. गृह. संस्था, मर्या.,** वाकड, पुणे ४११०५७.

***

### ✻ महत्त्वाचे निवेदन ✻

**सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कामकाज सुरळीत, पारदर्शक करण्यासाठी महासंघातर्फे १ दिवसीय, ३ दिवसीय तसेच सोसायटीमध्ये जाऊन समिती, व्यवस्थापक व सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.**

**संस्थेने उपविधी क्रमांक ६७(अ) चौदा नुसार १० रु. महिना प्रमाणे प्रत्येक सभासदाकडून घेतलेला शिक्षण निधी या प्रशिक्षणासाठी खर्च करायचा आहे.**

**प्रशिक्षणाच्या अधिक माहितीसाठी महासंघ कार्यालयाशी संपर्क साधावा.**

**०२०-२४४५४०१० / ९११२१९१६११ / ९६८९८९८३६०**

# ‘‘महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम २०२६’’चे संक्षिप्त विश्लेषण

**राज्य सरकारने तब्बल सहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर राज्यातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी नवीन नियमावली जाहीर केली आहे. या संदर्भामध्ये सदरच्या नियम समजुन घेणे अत्यंत गरजेचे आणि महत्वाचे आहे. या संदर्भातील बदल झालेले नियम समजून घेण्याआधी कायदेविषयक कालक्रम (legislative times) समजून घेणे महत्वाचे आहे ते खालीलप्रमाणे आहेत.**

| **साधन (Instrument)** | **वर्ष** | **तपशील** |
|---|---|---|
| महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा | १९६० | मुळ कायदा (Principal Act) |
| महाराष्ट्र सहकारी संस्था नियम | १९६१ | मुळ नियम (Principal Rules) |
| अध्यादीशाद्वारे सुधारणा | २०१९ | कलम १५४ बी गृहरचना / गृहनिर्माण संस्थासाठी नवीन प्रकरण जोडले गेले. |
| मंजुरी (Ratification) | २०१९ नंतर | विधानसभा व विधान परिषदेद्वारे मान्यता |
| सुधारणा- प्रकरण ११बी जोडले गेले | २०२६ | केवल सहकारी गृहरचना / गृहनिर्माण संस्थाना लागू. |

प्रकरण ११-बी ही मुख्य दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सदरचे प्रकरण ११-बी हे केवळ सहकारी गृहनिर्माण संस्थांना लागू आहे व सहकारी क्षेत्रातील इतर कोणत्याही संस्थेला हे लागू नाही. यात विद्यमान नोंदणीकृत संस्था आणि नवीन संस्थांची स्थापना या दोन्ही बाबींचा समावेश आहे.

त्यातील बाबी (नियम १ ते १४) नव्याने जोडले गेलेले आहे. ह्याचा संशीप्त कायदेशीर विश्लेषण हे खालीलप्रमाणे आहे.

**नियम १ :** संदरचा नियम सांगतो की, मूळ नियमांमधील अनेक तरतुदी सहकारी गृहनिर्माण संस्थांना लागू राहाणार नाहीत. तसेच मुळ नियामांमधील कोणत्या तरतुदी लागु राहाणार नाही त्याची यादी सदरच्या नियमामध्ये दिलेली आहे. सदरचे नियम म्हणजे ४, १९, नियम २० चा पोट नियम १, नियम २२, २५, २७, ३० अ ३५ ते ४८, नियम ४९ ब, ४९ क, ५३, ५३ क, ६३ अ, ६६, ८६ अ, नियम ९३ ते १०३ हे मुळ नियमांतील नियम सहकारी गृहनिर्माण / गृहरचना संस्था यांना लागु राहाणार नाहीत.

**नियम २ :** नाव राखून ठेवणे आणि संस्थेची नोंदणी (फॉर्म १) सदरच्या दुरुस्तीअन्वये फॉर्मचे स्वरुप बदलले आहे. संस्थेच्या नोंदणीसाठी नवीन अर्ज स्वरूप (फॉर्म १) लागू केलेला आहे. तसेच नाव राखून ठेवण्याच्या (Name Reservation) कालावधीत कपात केलेली आहे पूर्वी ९० दिवस होते, आता नाव राखून ठेवल्याच्या तारखेपासून ६० दिवस असेल म्हणजे संस्थेची नोंदणी ही ६० दिवसात पूर्ण करणे गरजेचे आहे. तसेच अधिक वेळ लागल्यास, निबंधकाची (Registrar) विशेष परवानगी आवश्यक असेल, दीर्घ विलंब टाळण्यासाठी हा नियम करण्यात आलेला आहे तसेच सेवा हमी हक्क कायद्याशी सुसंगत करण्यात आला आहे.

**नियम ३ :** नोंदणी शुल्क व नोंदणी (Registration Fees) बाबत सुधारणा करण्यात आलेली आहे. पूर्वी संस्थेच्या आकाराचा विचार न करता एकसमान शुल्क होते, आता नोंदणी शुल्क हे खालीलप्रमाणे असेल -

| **संस्थेचा प्रकार** | **सभासद संख्या** | **शुल्क** |
|---|---|---|
| भाडकरू मालकी गृहनिर्माण संस्था | - | रु. ५,०००/- |
| भाडेकरू सह-भागीदारी गृहनिर्माण संस्था | २५ पर्यंत<br>२६ ते १०० पर्यंत<br>५१ ते २५० पर्यंत<br>२५० पेक्षा जास्त | रु. २,५००/-<br>रु. ५,०००/-<br>रु. ७,५००/-<br>रु. १०,०००/- |
| इतर गृहनिर्माण संस्था<br>सहकारी गृहनिर्माण संस्था<br>संस्थाचा संघ | -<br>-<br>- | रु. ५,०००/-<br>रु. ५,०००/-<br>रु. ५,०००/- |

**नियम ४ :** सदस्यत्वाच्या अटी ह्या सदस्यत्वाचे अर्ज कायद्यांतर्गत विहित केलेल्या नमुन्यानुसारच असावेत. सदस्यत्वासाठी

किंवा सदस्यत्वातील बदलासाठी आता नोंदणी न केलेले दस्तऐवज (Unregistered Instruments) स्वीकारले जाणार नाहीत. सदस्यत्व मिळविण्यासाठी नोंदणी कायदा, १९०८ अंतर्गत नोंदणीकृत दस्तऐवजच वैध मानले जातील.

**नियम ५ :** सहयोगी सदस्यत्व (Associate Membership) सहयोगी सदस्यत्व कसे मिळवायचे याबद्दल आता स्पष्टता देण्यात आली आहे (पूर्वी कायदा आणि जुन्या नियमांमध्ये याबद्दल स्पष्ट तरतूद नव्हती). पात्र कुटुंबीय (कलम १५४ ब १ (१८-अ) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे उदा. भावंडे, पालक, मुले, इत्यादी) फॉर्म वाय-५ अ द्वारे अर्ज करू शकतात. व्यवस्थापन समिती (Management Committee) ठराव मंजूर करते आणि सहयोगी सदस्याची नोंद दप्तरी घेते. सहयोगी सदस्यत्व रद्द करण्याची तरतूद आता स्पष्टपणे समाविष्ट करण्यात आली आहे ती म्हणजे सहयोगी सदस्याचा मृत्यू झाल्यास वा मुख्य सदस्याने सदस्यत्व रद्द करण्याची लेखी विनंती केल्यास सहयोगी सभासदत्व रद्द होईल. म्हणजेच सहयोगी सदस्यत्व हे चार परिस्थितीमध्ये रद्द होईल. मूळ सभासदाचा मृत्यू झाल्यावर, मूळ सभासदाने लेखी पत्र देउन विनंती केल्यास, सहयोगी सभासदाचा मृत्यू झाल्यास, सहयोगी सभासदाने राजीनामा दिल्यास.

**नियम ६ :** तात्पुरते/हंगामी सदस्यत्व - दोन विशिष्ट परिस्थितीमध्ये तात्पुरते सदस्यत्व दिले जाते त्यातील पहिली म्हणजे नामनिर्देशित व्यक्ती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार नामनिर्देशित व्यक्ती ही केवळ एक विश्वस्त असते. कायदेशीर वारस तसेच कायदेशीर मालकी हक्क निश्चित होईपर्यंत तात्पुरते सदस्यत्व हा एक मधला दुवा म्हणून काम करते. तसेच कौटुंबिक व्यवस्था नोंदणीकृत कौटुंबिक व्यवस्था दस्तऐवज (उदा. वाटप पत्र कौटुंबिक समझोता करार) हा सदस्यत्वाच्या अर्जासाठी आधार ठरू शकतात. पात्रतेसाठी दस्तऐवज नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. तोच तात्पुरता सदस्याला मालकी हक्क मिळकत नाही तसेच त्याचे नाव देखील भाग प्रमाणपत्रावर येत नाही.

**नियम ७** : शैक्षणिक प्रशिक्षण (Educational Training) ह्या बदलामुळे आता सर्वांसाठी वार्षिक प्रशिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. सामान्य सदस्य वर्षाला किमान ३ तासाचे १ सत्र तर व्यवस्थापन समिती सदस्य व सोसायटी कर्मचारी यांना वर्षाला किमान ३ तासांची २ सत्रे अनिवार्य करण्यात आलेली आहेत.

**नियम ८ :** नामनिर्देशन (Nomination) नामनिर्देशन प्रक्रिया बव्हंशी पूर्वीच्या नियमाप्रमाणेच कायम ठेवण्यात आली आहे. नवीन भर म्हणजे सदस्याच्या लेखी विनंतीवरून आता नामनिर्देशन स्पष्टपणे रद्द केले जाऊ शकते. सोसायटीने दिलेली नामनिर्देशने आणि रद्द केलेली नामनिर्देशने या दोन्हीची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

**नियम ९ :** नामनिर्देशन नोंदवही (Nomination Register) सोसायटीने नामनिर्देशनासाठी एक स्वतंत्र नोंदवही तसेच तात्पुरत्या सभासदाच्या संदर्भामध्ये देखील नोंदवही ठेवणे बंधनकारक आहे.

**नियम १० :** कर्ज उभारणीच्या अटी (Conditions for Borrowings) कर्ज घेण्याची मर्यादा ही सोसायटी तिच्या वसूल भागभांडवलाच्या १० पट मर्यादेपर्यंत कर्ज उभारले जाऊ शकते तसेच जमिनीच्या मुल्यांकनाप्रमाणे देखील कर्ज उभारले जाऊ शकते. सदरचा नियम हा स्वयंपुर्नविकसनासाठी फायद्याचा आहे.

**नियम ११ :** निधीची निर्मिती (Creation of Funds) नवीन नियमांनुसार खालील निधी हे उभारले जाऊ शकतात. राखीव निधी, कर्ज निवारण निधी, दुरुस्ती व देखभाल निधी, मोठी दुरुस्ती निधी, शिक्षण व प्रशिक्षण निधी, निवडणूक निधी, कल्याण निधी, मूळ निधी, तसेच सर्वसाधारण सभेच्या परवानगीसह इतर कोणताही निधी.

**नियम १२ :** शुल्काची आकारणी (Levy of Charges) या मध्ये थकीत रक्कमेवरील (Default) व्याजदर २१ टक्यावरून १२ टक्के साधे व्याज (Simple Interest) इतका कमी करण्यात आला आहे. (हा बदल १८ जून २०२६ पासुन लागू होईल.) शुल्काचे प्रकार (Charge Heads) निश्चित केले आहेत.

| **शुल्क (Charge)** | **आकारणीचा आधार (Basis)** |
|---|---|
| सेवा शुल्क (Service Charges | समान-फ्लॅटच्या आकाराचा विचार न करता |
| मालमत्ता कर (Property Tax) | कार्पेट एरियानुसार (स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आकारणीनुसार) |
| पाणी पट्टी (Water Charges) | इनलेटवर आधारित (पूर्वीची पद्धत कायम) |
| लिफ्ट देखभाल (Lift Maintenance) व लिफ्ट बदलून नवीन बसवणे. | फक्त लिफ्ट असलेल्या इमारतीसाठी संबंधित इमारतींमधील सदस्यांमध्ये विभागून |
| कार पार्किंग शुल्क | सर्वसाधारण सभने निश्चित केल्यानुसार |
| थकीत रक्कमेवरील व्याज | १२ टक्के साध्या व्याजापेक्षा जास्त नाही (पूर्वी २१ टक्के होते.) |

| | |
|---|---|
| अ-निवासी शुल्क (Non-occupancy charges) | सेवा शुल्काच्या १० टक्के (यातून पर्यंत हा शब्द वगळण्यात आला आहे.) |
| विमा (Insurance) | कार्पेट एरियानुसार |
| भाडेपट्टा भाडे | कार्पेट एरियानुसार |
| सिंकिंग फंड | सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या दराने, प्रत्येक युनिट/ सदनिकेच्या बांधकाम खर्चाच्या किमान ०.२५ टक्के या प्रतीवर्ष असेल. |
| मोठ्या प्रमाणातील दुरुस्ती | कार्पेट एरियानुसार |
| शिक्षण व प्रशिक्षण | प्रति सदस्य रू. १०/- |

क्षेत्रफळावर आधारित शुल्कासाठी कार्पेट एरिया हेच मानक असेल जर करारांमध्ये बिल्ट-अप किंवा सुपर बिल्ट-अप एरिया दर्शवला असेल, तर कार्पेट एरिया निश्चित करण्यासाठी महानगरपालिका/ स्थानिक प्राधिकरणाकडील मंजूर मजला नकाशाचा वापर करावा. तसेच लिफ्टच्या नियमात आता जुनी लिफ्ट बदलुन नवी बसवणे हे सुद्धा त्याचा इमारतीमधील सभासदांनी सारखा वाटुन घ्यायचा आहे.

**नियम १३ :** सोसायटीचे व्यवस्थापन (६ मुख्य मुद्दे)

१. नविन उपविधी प्रविष्ट झाल्यापासून ३ महिन्याच्या आत नवीन उपविधी स्वीकारावे लागतील.

२. व्यवस्थापन समिती आता सर्वसाधारण सभेच्या ठरावांचे पालन करण्याना कायदेशीररित्या बांधील आहे. (पूर्वी ही एक अलिखित प्रथा होती आता नियम १३ मध्ये ती संहिताबद्ध करण्यात आली आहे).

३. आता हायब्रीड (प्रत्यक्ष व ऑनलाईन) सर्वसाधारण सभा घेण्यास परवानगी आहे. प्रत्यक्ष उपस्थिती (Physical attendance) हा पाया असलेले जे सदस्य प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाहीत ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/ ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे उपस्थित राहू शकतात. ऑनलाईन प्लॅटफॉर्मची व्यवस्था व्यवस्थापन समितीने करणे आवश्यक आहे. हा प्लॅटफॉर्म सहभाग घेणाऱ्या सदस्यांची ओळख पटवण्यास आणि रेकॉर्डिंग करण्यास सक्षम असावा. व्यवस्थापनाने या सभांचे रेकॉर्डिंग जतन करावे आणि सहभागी सदस्याची ओळख (नोंदणीकृत मेलद्वारे) सत्यापित करावी. ऑनलाईन उपस्थित राहाणारे सदस्य देखील कोरममाठी ग्राह्य धरले जातील.

४. पुनर्विकासाठी विशेष तरतुदी : पुनर्विकासासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्यासाठी १४ दिवसांची नोटीस अनिवार्य आहे. (५ दिवसांची नाही). पुनर्विकासाच्या बैठकीला उपनिबंधक / सहाय्यक निबंधक यांची उपस्थिती आता अनिवार्य आहे. (पूर्वी जीआरनुसार ती ऐच्छिक होती.) मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले होते की जीआरला कायद्याचे पाठबळ नाही. आता नियमातच तशी सुधारणा केली आहे.) पुनर्विकासाच्या सर्व बैठकांचे (हायब्रीड किंवा प्रत्यक्ष) व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे बंधनकारक आहे. अध्यक्षांनी हे रेकॉर्डिंग जतन करावे आणि त्याची एक प्रत संबंधित निबंधक कार्यालयाकडे सादर करावी.

५. सह-निवड (Co-option) रिक्त जागांवर सदस्याची सह-निवड करण्यासाठी आता निबंधक कार्यालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाहीय. व्यवस्थापन समिती स्वतंत्रपणे सह-निवड करू शकते.

६. अर्थसंकल्पाबाहेरील (Beyond-budget) खर्चाची सुधारित मर्यादा (सर्वसाधारण सभेच्या मंजुरीशिवाय व्यवस्थापन समितीला असलेला अधिकार) -

| **सदस्य संख्या** | **मर्यादा** |
|---|---|
| २० पर्यंत | रु. १,००,०००/- |
| २६ ते ५० | रु. २,००,०००/- |
| ५१ ते १०० | रु. ३,००,०००/- |
| १०१ ते १००० | रु. ४,००,०००/- |
| १००० व त्यापेक्षा जास्त | रु. ५,००,०००/- |

**नियम १४ :** वसुलीची प्रकरणे (Recovery Matters) - कलम १५४ बी-२९ अंतर्गत वसुली प्रमाणपत्राच्या (Recovery Certificate) अर्जाचा निपटारा /निर्णय आता पहिल्या सुनावणीच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत करणे आवश्यक आहे. (अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून नाही).

पूर्वी एका परिपत्रकाद्वारे ६ महिन्यांची मुदत दिली होती. आता नियमामध्ये ३ महिने अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे.

**- ॲड. कणाद भारत लहाने**
(बी.एस.एल., एलएल.एम.)

***

सहकारातून समृद्धीकडे वसुधैव कुटुंबकम सहकारी संस्थांमधील सहकार्य

सहकार से समृद्धि के 5 स्वर्णिम वर्ष

भारत सरकारच्या सहकार खात्यास ५ वर्षे पुर्ण झाल्याबद्दल

# सहकार सप्ताह

**सोमवार, दि. २९ जुन २०२६ ते सोमवार, ६ जुलै २०२६**

**※ कार्यक्रम पत्रिका ※**

| दिनांक | वेळ | स्थळ | कार्यक्रम | विषय | क्यू आर कोड |
|---|---|---|---|---|---|
| गुरुवार २५ जुन २०२६ | स.११.३० ते दु.१२.३० | हॉटेल श्रेयस, आपटे रोड, डेक्कन जिमखाना, शिवाजीनगर | पत्रकार परिषद | नियोजित उपक्रम घोषित करणे. | |
| शनिवार २७ जुन २०२६ | स.९.०० ते दु.११.३० | यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड, पुणे | सह. गृह. संस्था मेळावा | धोरण/योजनेची जनजागृती करणे. | |
| रविवार २८ जुन २०२६ | स.९.०० ते दु.११.३० | यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड, पुणे | सह. गृह. संस्था मेळावा | सहकारी संस्थेची अखंडता जपणे. | |
| | स.१०.३० ते दु.१२.३० | भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी कलामंदिर, ब्रेमेन चौकजवळ,औंध | विद्यार्थी मेळावा | आपल्या भविष्यातील नेतृत्वांचा सन्मान करणे. | |
| सोमवार २९ जुन २०२६ | स. ८.४५ | पंचवटी, पाषाण रस्ता, पुणे | नोंदणी आणि उद्घाटन समारंभ | सहकार सप्ताह उद्घाटन व सहभाग नोंदणी करणे. | |
| | स.९.०० ते दु.९.१५ | सक्सेस क्लब हाऊस, पंचवटी, पाषाण रस्ता, पुणे | सहकार झेंडा वंदन, ध्वजारोहण, प्रतिज्ञा | सहकार सप्ताहाची सुरुवात आणि सहकारास बळकटी देण्याची प्रतिज्ञा. | |
| | स. ९.१५ ते दु.१०.०० | उद्यान विभाग, पंचवटी, पाषाण रस्ता, पुणे | वृक्षारोपण | समृद्ध वातावरण निर्मिती हरित उपक्रम. | |
| | स.१०.१५ ते दु.१०.४५ | उद्यान विभाग,पंचवटी, पाषाण रस्ता ते पुणे इंटरनॅशनल सेंटर (PIC) | सहकार दिंडी | दिंडीव्दारे जनजागृती उपक्रम. | |
| | स.११.०० ते दु.२.०० | पुणे इंटरनॅशनल सेंटर (PIC) पंचवटी, पाषाण | पर्यावरण, एआय, जनगणना, रिडेव्हलपमेंट, एसआयआर इ. | आपल्या कृतीतून सहकारी ऐक्य जागृती. | |
| मंगळवार ३० जुन २०२६ | स.१०.३० ते दु.१२.३० | स्कूल ऑफ लॉ, एम.आय.टी., कोथरुड, पुणे | जेष्ठ नागरिक, महिला, सेवाभावी संस्था इ. चा सहकारातील सहभाग | सहकार कायदे व धोरण | |
| गुरुवार ०२ जुलै २०२६ | स. ८ ते ११ | निसर्ग कृषि संस्था, नांदिवली, ता. मुळशी, जि. पुणे | वृक्षारोपण, सेंद्रिय शेती, शेतकऱ्यांसाठी चर्चासत्र | हरित व विषमुक्त शेती उपक्रम | |
| | दु. २.०० ते दु. ४.०० | वैकुंठ मेहता राष्ट्रीय सह. प्रबंध संस्थान, युनिव्हर्सिटी रोड, पुणे | सहकार मेळावा | शैक्षणिक व संस्थात्मक दृष्टिकोन, मांडणी. | |
| | सायं.५.३० ते ७.३० | इंस्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स, शिवाजीनगर | रेनवॉटर हार्वेस्टींग, सोलर पॅनल | पंतप्रधान सुर्यघर योजना, हरित उपक्रम, भूजल संवर्धन/पर्यायी ऊर्जा इ. जनजागृती | |
| शुक्रवार ०३ जुलै २०२६ | स.१०.३० ते दु.१२.३० | कॉसमॉस बँक, कॉसमॉस टॉवर, युनिव्हर्सिटी रोड, शिवाजीनगर, पुणे | सहकार मेळावा | सामायिक यशांवर चिंतन करणे. | |
| शनिवार ०४ जुलै २०२६ | सायं. ५.०० ते ७.०० | बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय बीएमसीसी, डेक्कन, पुणे | युवा सहकारी संस्था शुभारंभ | पुढच्या पिढीच्या नेतृत्वाला प्रोत्साहन देणे. सहकार, कला, क्रिडा, साहित्य इ. | |
| | सायं.७.१५ ते ८.४५ | ऑनलाईन | प्रा. उमाकांत दास गोखले इंस्टिट्यूट, पुणे | जेन झी (युवावर्ग) यांच्यासाठी : भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचे परिवर्तन, पुढील दोन दशकांत भारतीय अर्थव्यवस्थेत होणारे बदल | |
| रविवार ०५ जुलै २०२६ | सायं. ४.३० ते ६.३० | सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक लि. सांगली-मिरज रोड, सांगली | सांगली गृहनिर्माण महासंघ, शुभारंभ, सहकार परिसंवाद | धोरण जागरूकता विस्तृत करणे. | |
| सोमवार ०६ जुलै २०२६ | दु. ३.०० ते सायं. ६.०० | यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),बाणेर रोड, पुणे | विविध विषयांवर चर्चासत्र व समारोप कार्यक्रम | आपले संकल्प, उद्दिष्ट, दृष्टिकोन, उपक्रम याबाबत माहिती. | |

# नियमित पान

सहकार से समृद्धि के 5 स्वर्णिम वर्ष

**स**हकार या शब्दाचा अर्थ समजण्याच्या अगोदरच आपल्यावर सहकाराचे संस्कार कुटुंबात होत असतात. कुटुंबातील प्रत्येक जण एकमेकांना मदत करत असतो. कधी आईने म्हटले की डोके दुखते तर दादा किंवा ताई चहा करायला घेते. या सगळ्या व्यवहारामध्ये एकमेकांना मदत करणे, आस्था व्यक्त करणे हीच भावना असते. आपल्यावर सातत्याने असे सहकाराचे संस्कार होत राहतात. वैयक्तिकरित्या आपण कुटुंबामध्ये एकमेकांना मदत करतो म्हणजे सहकार करतो. समाजात वावरताना सहकाराची ही भावना मोठ्या प्रमाणात ठेवणं आवश्यक आहे.

दैनंदिन जीवनात आपण व्यवहार करतो. जेव्हा आपण कुणाला पैसे देतो तेव्हा त्याच्या बदल्यात आपल्याला वस्तू मिळते, सेवा मिळते, पण जेव्हा सहकार्य करतो तेव्हा त्यामध्ये अशाप्रकारे काही मिळणं अपेक्षित नसते. मात्र प्रेम, समाधान मिळू शकते.

पण या सहकार्याच्या भूमिकेतूनच महाराष्ट्रात विविध संस्था उभ्या राहिल्या सूतगिरण्या, सहकारी साखर कारखाने, दूध महासंघ, पतसंस्था, सहकारी बँका अशा कितीतरी संस्था यशस्वीपणे चालवल्या जात आहेत.

आज आपण केवळ सहकारी गृहनिर्माण संस्थाबद्दल विचार करू या. विविध क्षेत्रातून संस्थेमध्ये लोक येतात, सभासद होतात, एकत्रित येतात आणि यातील पुष्कळ व्यक्ती अनोळखी असतात. तरीही सर्वजण एकत्रित येऊन गृहनिर्माण संस्था स्थापन करतात. संस्थेचा कारभार पाहण्यासाठी कार्यकारी मंडळ नेमले जाते. ही प्राथमिक जबाबदारी पार पडल्यावर त्या संस्थेचे कार्य करण्याची संपूर्ण जबाबदारी कार्यकारिणीची आहे असा समज होतो, पण सगळ्यांनीच हातबार लावणे अपेक्षित असते. मात्र सामान्य सभासदांचा प्रत्यक्ष सहभाग मिळत नाही. दुर्दैवाने बहुसंख्य ठिकाणी अशी परिस्थिती बघायला मिळते. काही पदाधिकारी जेव्हा आम्हाला भेटायला येतात तेव्हा ते पदाधिकारी खंत व्यक्त करतात की निवडणुका घ्यायच्या म्हटल्या तरी लोक पुढे येत नाही. काही ज्येष्ठ मंडळी नाराज झालेली आढळतात.

मला वाटतं याबाबत गृहनिर्माण संस्थेच्या सर्व सभासदांनी गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. सभासदांच्या दैनंदिन जीवनातील कितीतरी गोष्टी एकमेकांशी संबंधित आहेत. संकूलातील स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, मुलांसाठी खेळण्याची जागा, ज्येष्ठ नागरिकांना विसाव्यासाठी कट्टा इत्यादी बाबी योग्य प्रकारे हाताळल्या गेल्या नाहीत तर त्याचा सर्वांनाच त्रास होतो. यासाठी आपल्या कुटुंबात जसे सहकाराचे वातावरण असते तसेच आपल्या गृहनिर्माण संस्थेतही निर्माण होणे आवश्यक आहे. संस्थेला आपले कुटुंब मानून सहकाराची भावना ठेवून कार्यरत होणे अपेक्षित आहे. अर्थात यामुळे संस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालवणारी माणसं उपलब्ध होतील आणि त्यात सर्वांचाच फायदा होईल. अर्थातच ही भावना निर्माण होण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

आपला मित्र हा प्रथम अनोळखीच असतो. प्रथम भेटीत ओळख होते. भेटी वाढत जातात. ओळखीचे रूपांतर मैत्रीत होते. दोघांचे सर्वच विचार एकमेकांना पटतात असे नाही; परंतु पुष्कळसे विचार जुळतात. आवडी जुळतात. ही प्रक्रिया सततच्या संपर्कामुळे होते. याचप्रमाणे गृहनिर्माण संस्थेतही सभासदांना नियमितपणे एकत्रित आणणे, सातत्याने ते एकमेकांच्या संपर्कात येतील यासाठी संस्थेच्या कार्यकारिणीने पुढाकार घेणे गरजेचे आहे. यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे लागेल. विविध स्पर्धांचे आयोजन करता येईल. चित्रकला, रांगोळी, निबंध, क्रीडा अशा स्पर्धा आयोजित केल्यास सर्व वयोगटातल्या रहिवाशांचा सहभाग होऊ शकतो.

सभासद असे सातत्याने जवळ आल्यावर त्यांच्यात भावबंध निर्माण होईल. त्याचा परिणाम सभासदातील सहकाराची भावना वाढून संस्थेतील वातावरण सुसंस्कृत समाजाचे प्रतिबिंब असेल.

**दिनांक २९ जून ते ६ जुलै या कालावधीत आपण सहकार सप्ताह साजरा केला. या मागची भूमिका सहकारातून समृद्धी हीच आहे.**

यासाठी आपणा सर्वांनाच आपले सहकाराचे क्षेत्र विकसित करण्याची आवश्यकता आहे.

**– श्री. सुभाष चं. कर्णिक**
उपाध्यक्ष

***



केंद्रिय सहकार मंत्रालयास ६ जुलै २०२६ ला पाच वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त २९ जून ते ६ जुलै या दरम्यान सहकार सप्ताह साजरा करण्याबाबत सूचना देण्यासाठी आयोजित बैठकिसाठी उपस्थित मा. सहकार आयुक्त व महासंघाचे संचालक.



अंकुर प्रतिष्ठान आयोजित सोसायटी कार्यशाळेत ॲड. मिताली सावळेकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी मान्यवरांसह उपस्थित महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन. - दि. २७ जून २०२६.




सुरत येथे NCUI तर्फे सहकारी संस्थांची स्थापना याविषयावर युवांसाठी ३ दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. त्यासाठी महासंघाचे ४ कर्मचारी उपस्थित राहिले होते. दिनांक २३, २४, २५ जून २०२६



सकाळ Simacs आणि महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३ दिवसीय व्यवस्थापक प्रशिक्षणासाठी उपस्थित महासंघाचे संचालक व सहभागी प्रशिक्षणार्थी

सहकार से समृद्धि के 5 स्वर्णिम वर्ष



सहकार सप्ताह उद्‌घाटन प्रसंगी सहकार शपथ घेताना संस्था प्रतिनिधी – दि. २९ जून २०२६.



MIT स्कूल ऑफ लॉ मध्ये आयोजित सहकार सप्ताह कार्यक्रमासाठी उपस्थित सह. संस्थांचे प्रतिनिधी आणि MIT चे डीन डॉ. संतोष आघाव. दि. ३० जून २०२६

**संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणभाष क्रमांक तसेच ई–मेल आय.डी. कृपया महासंघाला कळवावेत.**

''वास्तु-दर्शन'' च्या अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी आणि जाहिरातींशी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ सहमत असेलच असे नाही.

मा. अध्यक्ष / सचिव